Comments 2024

माझे अक्षर खराब आहे.

मैं तुझको भगा
लाया हूँ तेरे घर से
मैं तुझको भगा
लाया हूँ तेरे घर से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से
जाऊँगा दूर लेके तुझे
सब की नज़र से
जाऊँगा दूर लेके तुझे
सब की नज़र से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से
तेरे बाप के डर से ( गोविंदाचे गाणे ).

३०-४० वर्षांत लाखे ( वाचकांपर्यंत ) पोचेपर्यंत इथले मराठी भाषक मराठीलाच ' पोचवतील ' अशी एक शक्यता आहे !

ठीक आहे -- जाडी जरा कमी झालीय मिताहारामुळे -- पट्ट्याला दोन जास्तीची भोके पाडून घेतली !

काही लोक कसे गुरुबंधू असतात तसे लव्हेकर सर आणि मी कविबंधू ! ( पेसोआप्रेमी )

Hemangi Nerkar त्याच्या आधीच्या तुमच्या त्या नाल्याजवळच्या घरीही मी अनेकदा आलो होतो.
( आरती प्रभूंचे घर ).

आणखी एक प्रकार सांगतो. ' जागचं हलायचं नाही ' नामक माझे एक नाटक. ७० च्या दशकातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी सादर करणारे ते नाटक. संवादांचे मात्र स्वातंत्र्य घेतलेले आहे. तर त्या नाटकात, हॉटेलमध्ये नाचणाऱ्या नर्तकीचे एक पात्र आहे. त्याचे प्रमाणपत्र मिळालेले होते. नंतर काही काळाने मी त्यातल्या काही भागाचे पुनर्लेखन केले आणि त्याचे नाव बदलून, ' गोळ्या काढलेले पिस्तूल ' असे केले. त्यामुळे, पुन्हा एकदा घ्यावे प्रमाणपत्र म्हणून मी ते या मांडळाकडे पाठवले. दरम्यानच्या काळात डान्सबारबंदी चा कायदा आला होता. त्यामुळे, या मंडळाने मला सूचना केली की ते नर्तकीचे पात्रच वगळावे लागेल ! मी त्यांना कळवले की हे सर्व पूर्वीच तुम्ही मंजूर केलेले असून, काही बदल केल्याने मी पुन्हा पाठवले आहे. त्यावर मंडळाने काही महिने चिंतन केले असावे. मग, अरुण नलावडे आल्यावर, गप गुमान ते प्रमाणपत्र माझ्याकडे पाठवण्यात आले !

तुम्ही बहुतेक त्या कादंबरीच्या दुसऱ्या भागाबद्दल लिहिले असावे. श्री. पु. भागवतांचेही तुमच्यासारखेच काही म्हणणे होते असे ऐकून आहे. माझे या बाबतीत वेगळे मत आहे. आणि खानोलकरांची गद्य शैली ही नेमाड्यांना आवडावी अशी सरळ निवेदनाची नाहीच आहे. तो मला काही दोष वाटत नाही.

बिस्वाल नामक चित्रकाराची अशी चित्रे पाहिली होती –

३१-०१-२०२४.

आमच्या जगात स्वागत आणि शुभेच्छा ! ( निवृत्तांच्या जगात ).

यस ! ही माझी मराठीला देन समजावी ! ( नभखुला रंगमंच )

अभिवाचन ऐकले. निर्धारित वेळात पूर्ण आशय पोचवण्याचा प्रयत्न चांगला वाटला ! ( नातं ‘ चे अभिवाचं ).

' लाईक ' वरून काही ' शहाणे ' माझे व्यक्तिगत मूल्यमापन करतात असे वाटल्याने हे क्लियर केले आहे !

माझ्या पोस्टवरच्या सर्व कॉमेंटसना मी लाईक देतो. काही न पटणाऱ्या असल्या तरीही.

कधी त्यात उपयुक्त माहिती असते -- ती मिळाल्याबद्दलही लाईक असते -- पण, निव्वळ द्वेषयुक्त, इतरांना क्षुद्र लेखणाऱ्या जागा मात्र नक्कीच टाळतो.

( मुसलमान ) आहेत ना ! माझ्या कॉलेजचे नाव होते -- इस्माईल यूसुफ कॉलेज !

थोडी अधिक माहितीही देतो -- बँकेतला माझा पहिला जिगरी दोस्त होता अरुण अब्राहम -- आमची बऱ्याच दिवसांत भेट नाही पण मैत्री तीच आहे !

खानोलकरांच्या ' एक शून्य बाजीराव ' मध्ये एक वाक्य आहे -- " पोरे हो, आम्ही तुम्हासी ओळखिले -- आम्ही तुमचे बारुसे जेविलो ! "

त्यामुळे बिचारा भूमिका नाही घेऊ शकला ! ( काफ्का )

कॉलेजच्या एका गाईडसाठी मी या नाटकाचा दृशयानुसार मराठीत गोषवारा तयार केला होता ! ( गॅलिलिओ ).
२९-०२-२०२४.

वा ! मर्ढेकरही होते इथे शिकवायला. शिवाय शांताराम. आणि पु ल ही इथले विद्यार्थी ! पूर्वी इथे अनेक हिंदी चित्रपटांचे चित्रीकरण झालेले आहे. ( इस्माईल युसुफ कॉलेज ).

पहिल्या ओळीतच १०० पैकी १०० -- बाकी कमजादा रहने दो !
( दर पार्टीच्या शेवटी एक क्वार्टर कमी पडते ! – ही ओळ. )

certainly it is going to be a very good performance -- do it !
( अमेरिकेतले इंग्रजी ढोलताशे. )

मनातून मनात असा हा रोग फैलावतो -- आधी तो जाणवत नाही -- नंतर तो बीपी, मधुमेह आणि हृदयरोग यांत रूपांतरित होतो -- पण हे आधीच्या ट्रोलिंगमुळे झाले, हे कधीच उघड होत नाही ! ( ट्रोलिंग ).

मला न पटणारे / न समजणारे ते वाईट -- अशी वाईटची सोपी व्याख्या आहे या मराठी प्रदेशात !

मलाच ते पूर्ण नाव बोजड वाटत होते. चंप्र करावे असे वाटत होतेच. दरम्यानच्या काळात प्रभाकर पणाशीकरांबरोबर माझ्या एका नाटकासंबंधी बोलणी चालू होती. प्रकाश बुद्धिसागर ते बसवणार होता. पण ते काही घडले नाही. तरीही, या काळात पणाशीकरांनी मला चंप्र म्हणायला सुरुवात केली होती. म्हटले, हेच ठीक आहे. मग ते कंटिन्यू केले.

होय. आता हे आधी ( गिरीश पतके ) की पणशीकर ते आठवत नाही. हे दोन्ही मिळून योग्य ते घडले. नीलकंठ फुले यापेक्षा निळू फुले हा खूपच ग्रेट असतो !

सगळे वाचले. काही समजून घेण्याच्या प्रक्रियेत आपण असू तर एकमेकांना धन्यवाद म्हणायचे कारण नाही. तुझ्या या पोस्टमधला प्रांजळपणा हा खास तुझा आहे. यात हटवादीपणा नाही. ते कुणाला उपयोगी वा इंटरेस्टिंग वाटो वा न वाटो तू तुझा शोध चालू ठेवणे हे घडावेच. अचानक एखादा उलगड्याचा क्षण येऊ शकतो !
( निसर्ग देशमुखसाठी ).

उत्तम लेख ! आम्ही पडद्यावर पाहतो त्यामागे किती अभ्यास, विचार असतात हे समजले ! बेष्ट !
( गिरीश रांगणेकर ).

यांतले अध्यापनाबाबतचे पुस्तक मी वाचलेले आहे. खरोखरच छान आहे. ( प्रेमा साखरदांडे यांचे पुस्तक ).

मी त्याहून कमी समज असलेला आहे ! इलाज नाही !

परेलकरांचे वा माझे चरित्र हा इतिहासाचा भाग नसतो पण गांधी वा सावरकर यांचे चरित्र हा इतिहासाचा भाग असतो -- हेही त्यांना समजत नाही -- कुठे डोकेफोड करत बसा -- हाच विचार बरा पडतो –

माझ्यासारख्याने कसे जगले पाहिजे असा काही साचा नसतो -- मी माझ्या आकलनाप्रमाणे जगणार, तुम्ही तुमच्या आकलनाप्रमाणे. सगळे सारखे असायला हवेत हा आग्रह कशाला ?

माझे पूर्ण लेखन मग तुम्ही म्हणता तसे बोटचेपेच आहे. राजकीय भूमिका घेणारे म्हणजे शहाणे आणि शूर असे मी मानत नाही. माझ्या वेबसाईटचे नुसते होमपेज बघा जमल्यास.

होय, ते दिसतेच आहे. मी तथाकथित ' पुरोगामी ' पणे काहीच लिहीत नाही तर मला अमूकच राजकीय भूमिका घेण्याची सक्ती करू नये, एवढेच मी म्हणतो. मी एक लेखक आहे तर मी अमूकच प्रकारे लिहावे अन्यथा मी बोटचेपा वा पळपुटा आहे असे म्हणण्याला मी महत्त्व देत नाही.

मी सिनेमा म्हणूनच पाहिला आणि नाही आवडला. ( सावरकर ).

कोणत्या ना कोणत्या साच्यातच जगणे भाग आहे अशा निराश निष्कर्षापेक्षा जरा वेगळे, इतकेच !

तुमचे, माझे, त्यांचे -- कुणाचेही मत -- ते असू द्या -- या खालील मजकूरात काही सापडते का ते बघा ---

# मते

मी मते बाळगत नाही
ती वापरतो
वेळोवेळी बदलतो
मला ती उपरी असतात
त्या त्या वेळी मी
त्यांच्या पाठीवरून
डोक्यावरून हातही फिरवतो
त्यांच्याशी एकनिष्ठ राहणे
म्हणजे पायच तोडून घेणे
ये जानके मी त्यांच्याशी म्हणजेच
माझ्याशीही नसतो एकनिष्ठ
मते म्हणजे असते एक भीती
नसण्याची जल जानेकी
रद्दच होण्याची
ती टाळण्यासाठी
माझी मते बनतात एक संरक्षक भिंत
आणि जगाशी भांडणे वाढत वाढत
माझे असणे धोक्यात येत राहते
हे माहीत असल्याने मी जरा
फटकूनच वागतो त्यांच्याशी
कारण मते लबाड असतात
ती ठेवतात मनाला जखडून
आणि बाहेर
हक्काने मागत राहतात
त्यांच्यासाठी स्वातंत्र्य
मन माझे असो की
मला दिसणारे कोणतेही
मते म्हणजे असतात
सतत चालू असणारे अंत्यसंस्कार
आम्ही सगळेच असतो

मृत्यूच्या अंधारातले
उत्सवप्रिय आशावादी
काहींना असते पूर्ण खात्री
आणणार आहेत त्यांची मते स्वर्ग
त्यांना भेटतो त्यांचा बाप
तो म्हणतो
तुझ्यासारख्या अधार्मिकाला मारले
की मला मिळणार आहे स्वर्ग
तुझ्याशी लढताना मेलो तरीही
मतांना सतत
धारण करावे लागतात मुखवटे
संवेदनशीलतेचे
दु:खितांच्या भल्याचे
म्हणजे झाकून ठेवता येते
त्यांना त्यांची युगानुयुगांची
निरर्थक थरथर
मते असतात विभिन्न
पण एकोप्यासाठी झटणारी
ती काहीशी साशंकही असतात
एक गठ्ठा स्वप्नपूर्तीबाबत
मतांना वाटते
इतर मते आहेत फूटपाडी
कोणतीच मते तयार नसतात
नि:शस्त्र वावरायला हेर न व्हायला
तरीही बिचारी खात्रीत असतात बेसावाध
माझ्या मतांचे इतिहासभूगोल
मी कधीच अबाधित नाही धरत
त्यांचा खोटा वापर करत मजेत जगतो
त्यांना मन मानेल तेव्हा फेकून देत
--- ००० ---

हाच तर आहे प्रॉब्लेम ! सतत सगळ्यांनी मतवाले असणे, त्यामुळे मारामाऱ्या करणे, विध्वंस करणे आणि या सगळ्याला सन्माननीय म्हणणे ! ( असो. आपल्यात फारशी चर्चा होऊ शकत नाही त्यामुळे, ठीक. )

होय -- चहू बाजूंनी सहिष्णुता !

इथल्या पुरोगाम्यांच्या दृष्टीने प्रतिगामीच ! पण मी त्यांच्या मताला किंमत देत नाही.

सगळ्या कॉमेंटस वाचून थोडक्यात सांगतो. मी हिंदुत्ववादी लिहीत नाही तर माझ्यासारख्या लेखकाने हिंदुत्ववादी भूमिका घ्यायला हवी, असे सांगायला एकही हिंदुत्ववादी आजवर आलेला नाही. पुरोगामीच हा आक्रमकपणा करतात. या पुरोगामीगिरीमुळे इथे जे घडले आहे वा घडते आहे ते तालिबान्यांनी बुद्धमूर्ती फोडण्यासारखेच आहे. कलेचा आणि तत्त्वज्ञान वा अध्यात्म यांचा एकजीव संबंध असतो, हा मुद्दाही इथे एकाला आवडलेला नाही. या मुद्यामुळे त्यांना माझी काळजी वाटते असे सचिंतपणे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी व तशांनी निर्माण केलेल्या परिस्थितीबद्दल आपण सर्वांनीच चिंतन करायची गरज वाटल्याने ही पोस्ट दिलेली आहे.

सगळे विद्रोह हे सामाजिक-राजकीय परिवर्तनाच्या प्रेरणेतून येत नसतात, हे समजून घ्यायला हवे. मानसिक सवयी आणि सर्जकतेच्या नव्या शक्यता यांच्या संबंधांतून ते घडते. गालिब, पिकासो, डाली हे इथल्या पुरोगाम्यांना चालतील ? त्यांना कालिदास वा टागोरही नाही चालणार. उगीच सगळीकडे विद्रोह हा शब्द वापरून हा विषय नगण्य करता येणार नाही.

पुन्हा तेच ! मी काय करावे याचे कुणाचेही सल्ले नाही घेत हो मी ! पुरोगाम्यांना ही वाईट सवय असते म्हणून तर ही पोस्ट !

असे व्यक्तिगत मूल्यमापन करत सुटणे ही तर पुरोगाम्यांची खासियत आहे !

स्थितिशील दगडी डोक्यांच्या वातावरणात ग्रेट कविता ! ( पुंगलियांची ‘ दुसरा ‘ ही कविता ).

कारण ते डावे वा उजवे अशा साच्यात जगतात आणि त्यातच आयुष्य काढू इच्छितात ! ही पोस्ट म्हणजे एक प्रश्न नसून सगळ्यांच्याच जगण्यावरची कॉमेंट आहे. पण कट्टरपणे फक्त राजकीय जगणाऱ्यांना ते समजत नसावे.

प्रत्येक लेखकाने कुणाला काय वाटते आणि कोणतेही फडतूस राजकीय कट्टर कॉमेंटकार काय म्हणतात याची पर्वा न करताच लिहायला हवे !

तुम्ही स्वत:ला किती महत्त्वाचे मानता ते सांगितलेत तर तेच बरोबर समजून मीही स्वत:ला तितकाच महत्त्वाचा मानेन !

असे ठरवून जगता नसते येत हो -- उगीच गंमत ! आता मी सज्जन होतो, आता मी सोपा होतो, आता मी सामान्य होतो -- असले काही असू शकत नाही ! जो है सो है !

माझ्या पोस्ट वाचा आणि ठरवा तुमचे तुम्ही -- राजकीय घाण वाटली तर लगेच माझ्या मित्र यादीला रामराम करा -- ते दोघांनाही बरे पडेल.

या बाबतीत माझे आकलन वेगळे आहे पण जाऊ द्या, कंटाळा आला !

लेखक असे ' निर्भय बनो ' झाले की राजकीय आवेशातून दुसऱ्यांना तुच्छ लेखणाऱ्यांचे अवसान खतम होईल.

असला एखादा तुच्छतावादी कॉमेंटकार सुधारतच नसेल तर त्याला ब्लॉक करून टाकावे.

असे म्हणणारेच फक्त शहाणे आणि बाकीचे मूर्ख या टोनमध्ये बोललेले इथे चालणार नाही. तुम्ही म्हणता ते अध्यक्ष आधी अध्यक्ष होऊन स्वत: चुकलेले होते. साहित्याबद्दल न बोलता राजकीय भाषण ठोकणे हे त्यांनी केले होते. असले लोक होतात कशाला साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ?

मी समजा तुमच्या मताने वा जगण्याबाबतच्या आकलनाने नाही जगत आणि त्याचा अर्थ मी फालतू वा अमानुष आहे असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही माझ्या मित्रयादीतून बाहेर पडू शकता ना. हे कुणालाही लागू पडणारे आहे. कुणाचेही स्वयंघोषित श्रेष्ठत्व इतरांनी का मान्य करावे ?

या सगळ्या समस्यांचे बीज माझ्यात आहे असे मला दिसते -- मी तिकडे लक्ष देतो -- मी अमुक करत नाही म्हणजे हिम्मत नाही असे तुम्ही समजू शकता. चांगल्या कलावंतांना खरी हिम्मत कवटीच्या आत करावी लागते, हे एक दुर्लक्षित सत्य आहे.

राजकीय कट्टर कॉमेंटकार काहींना महत्त्वाचे वाटत असतील पण मला ते फडतूस वाटतात -- असे असावे ते ! किंवा जरा ' जास्तच वाईट ' म्हणण्याचा प्रकार असावा.

नको ती कटकट असे वाटून गप्प बसणारे बरेच आहेत.

३१-०३-२०२४.

मी बौद्धिक मतांचे नाही लिहीत, ही माहिती देतोय. आपण बोलतोय म्हणून. अन्यथा, एकदा लिहून झाले की लेखकाचा संबंध संपतो.

कलावंत कोणत्या विचारसरणीचा आहे हेच पाहतात आधी.

मन:पूर्वक धन्यवाद, दरेकर सर !

Sushil Shirsath तुमच्या तांत्रिक साहाय्याच्या भरंवशावरच तर मी ही पुस्तक प्रकाशनाची गाडी चालवत असतो !

घिसेपिटे अनुभव आणि गुळगुळीत आदर्शांच्या कल्पना -- असे असेल तर खोटेच !

कवितेत, हे विशेषण अमूकच विशेष्याचे असा निर्णय होण्याची गरज नाही -- त्या अनिश्चिततेसहच कविता जाणवत जावी. बौद्धिक अनेकार्थता ठीकच पण एकूण भान या अर्थी चांगल्या कवितेला एक ' न कळणारा ' अर्थही असतो. म्हणजे जाणवतो पण त्याचे बौद्धिक निवेदन शक्य होत नाही.

Balkrishna Kawathekar घटित नुसते रूटीन, सपक असू शकते.

आठवणीबद्दल धन्यवाद, डॉक्टर ! ( डॉ. नितीन एच.  देशपांडे. )

साभिनय वाचनाला कलेचा एक वेगळा दर्जा द्यायला हवा. नाट्यप्रयोगाला जशी अनेकांच्या सर्जकतेची देन असते, तसेच हे समजावे. सर्वच कवितांचे असे वाचन होऊ शकेल, असे नाही. हे वाचन उत्तम झालेले आहे ! धन्यवाद, लाखेजी ! ( स्पर्श या कवितेचे अभिवाचन. )

कवीचे मत म्हणजे आकाशवाणी असे मुळीच नाही !

योगायोग म्हणजे ही कविता १९७४ साली सत्यकथेत प्रसिद्ध झाली होती -- म्हणजेच तिची याच वर्षी पन्नाशी होत आहे !

खूपच मोठे आणि महत्त्वाचे काम ! अभिनंदन ! ( गिरीश रांगणेकरची इस्लामापूरच्या शाळेवरची फिल्म. )

हा लेखक याला आवडतो, तो त्याला आवडतो, मग चांगला लेखक म्हणजे काय -- इथून सुरुवात आहे. ज्या त्या जातीपातीचे लोक आपापल्या लेखकांचे कदाचित वाचण्याची शक्यता आहे. त्यामुळे, चिंता नसावी. ' मरू दे ' हा मंत्र आत्मसात करावा !

हे माणसाचे ' नॉर्मल ' जगणे आहे !

याला आजार म्हणाल तर अध्यात्मात शिरावे लागेल ! कारण ही मनाची अभेद्य क्वालिटी आहे !
२०-०४-२०२४.

या पुरोगामी महाराष्ट्रात -- जातवादी पुरोगामी, धर्मवादी पुरोगामी, भाषावादी पुरोगामी -- असे गट असावेत बहुतेक !

Hemant Karnik कोणाचे हे सांगायची गरज वाटत नाही -- का म्हणजे, तुमच्या-माझ्या जगण्यातली अब्सर्डिटी व्यक्त करावीशी वाटली म्हणून !

Nisarg Deshmukh कोणतेही मत म्हणजे सत्य नव्हे -- या अंगाने बघ.

Sameer S. Dalvi आता एका पुस्तकानंतर म्हणजे नाट्यलेखन पूर्ण पुस्तकरूपात आल्यानंतर कवितासंग्रह येत राहतील ---

जीएंना मराठीतला एक लेखक ' मोठ्यांचा चांदोबा ' म्हणून हिणवतो आणि काही लेखक त्यांना जीनियस म्हणतात, हा फरक रंजक आणि विदारक आहे. इथे जीएंबद्दल चारपाच लेखक बोलताहेत, चर्चा करताहेत. वंदना बोकील यांनी चर्चेला प्रश्न चांगले घेतलेले आहेत.

Siddharth Gaikwad या चर्चेतही आहे तो मुद्दा -- आणि वारंवार उगाळण्या इतका आहेच तो मुद्दा विवाद्य ! फार मोठ्या माणसाने मराठी विचारशक्तीला दिलेली ती चालना आहे !

' निरर्थक ' हा शब्द इथे वाईट अर्थाने वापरलेला नसून फक्त वस्तुस्थितीनिदर्शक म्हणून वापरलेला आहे.

एकूण सनसनाटीपणाचा परमोच्च बिंदू पाहता, वेडे न होता शांत राहू शकताहेत, हेच चांगले आहे ना !

कुणी या पक्षाकडे पाहात काही म्हणतो, कुणी त्या पक्षाकडे पाहात, कुणी एकूण आपल्या सर्वांच्या स्थितीकडे पाहात -- तिघांचेही एकमेकांना आवडणार नाही ! एवढी तर लोकशाही हवीच !

जेव्हा राजकीय भूमिका घेणे मस्ट असते तेव्हा कसला कलाधर्म आणि कसले काय !

Ratnakar Mahajan आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाही ऐसे मनी अनुभवावे ।। -- या ओळींचा साळुंके जो अर्थ सांगतात तो आख्खी गाथा मातीत घालणारा आहे !

Shriniwas Hemade मी नगण्यच आहे पण तुम्ही उल्लेखलेल्या माझ्या पोस्टमधला उपरोध तुमच्या लक्षात आलेला दिसत नाही ! तुकारामाचे मी अनेकदा ' ग्रेट ' या अर्थी उल्लेख केलेले आहेत !

साधे आहार-नियंत्रण उपोषण, धार्मिक उपोषण, सामूहिक उपोषण, लाक्षणिक उपोषण वा बेमुदत उपोषण यांच्याप्रमाणेच आमरण उपोषणही आज ना उद्या सोडायचीच पद्धत पडलेली आहे ! त्यामुळे, आमरण उपोषण हे तिसरे, चौथे, पाचवे असे कितीहीवे असू शकते ! हे पाहता, यातल्या भाषिक चुकीसाठी टीव्हीला जबाबदार नाही धरता येणार ! □

भाषा म्हणजे कोणतीही चिन्ह-अर्थ व्यवस्था -- अशा दृष्टीने विचार करून पहा –

माझ्या बाबतीत घडलेला एकच आणि कदाचित एकमेव किस्सा सांगतो. माझे लेखन चोरायच्या फंदात सहसा कुणी पडत नाही कारण त्या बाबतीत कुणी काही प्रश्न विचारले तर फे फे उडू शकते. पण तरीही एक घटना घडलीच. मी एक ' तिढा ' नावाचे नाटक लिहिले होते. विनायक पडवळला ते आवडले होते. तो ते सादरही करणार होता. त्यातच मध्ये एकदा त्याने छबिलदास मध्ये त्या नाटकाचे वाचनही घडवून आणले होते. पण, त्याच्याकडून रंगभूमीवर ते नाटक येणे काही घडले नाही. त्यानंतर काही काळ गेला. हे सर्व तिथेच संपले. नंतर एकदा विनायक एका नाट्य स्पर्धेला परीक्षक असताना तेच नाटक ' शह-काटशह ' या नावाने त्याच्या समोर सादर झाले ! ते पाहून त्याने त्या संबंधित लेखक-कलावंताला बोलावून घेतले आणि एकच प्रश्न विचारला, " कुणाचं आहे हे नाटक ? " तो गडबडला. " मी चंप्रंशी बोललो आहे " म्हणाला. " काय बोलला आहेस ? त्यांचं नाटक तुझ्या नावावर खपवण्याबद्दल ? " विनायकने ते नाटक त्या स्पर्धेतून बाद तर केलेच पण ते बाद करण्याचे कारणही जाहीरपणे त्याच्या भाषणात सांगितले ! ( आता हे नाटक, ' निर्मिती ' या नावाने माझ्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ).

क्षार कमी होणे आणि पाणी कमी प्यायले जाणे -- ही दोन कारणे सांगतात. अशा वेळी जरा मीठ खाऊन पाणी प्यावे. ( पेटके येण्यावर )

नाट्यलेखनातले बरेच रस्ते त्यांनी मोकळे केले ! ( तेंडुलकरांनी )

खरे तर आवड-निवड वा साहित्यातले स्थान हे विषय किरकोळच आहेत -- त्या त्या कलाकृतीच्या सर्जक प्रक्रियेबरोबर जाणारे कुणी आहेत का, हे महत्त्वाचे.

मराठी साहित्य खतम झाल्यावर आता त्याला अभिजात साहित्याचा दर्जा मिळेल !

आपल्या कला-संस्कृतीची मृतावस्था, मद्दडपणा, रटाळपणा जाणवणे -- ही सुरुवात असणार. मग असे का, चांगली कला म्हणजे काय -- यांवर चिंतन करावे लागेल. पण, हा सुरुवातीचा बिंदू तर आधी जाणवायला हवा -- त्यासाठी ही पोस्ट महत्त्वाची आहे. ( पुंगलियांची पोस्ट )

दोन गिरीश, एक चेतन आणि बाकी सर्व टीम ! उत्तम व्हायचा प्रयोग ! ( डावेदार )

काही लोकांच्या रक्तातच सततचा उपरोध आणि कुत्सितपणा असतो –

जनतेचे सामूहिक शहाणपण असे काही नसेलच तर मग लोकशाहीचा उदो उदो तरी करण्यात काय अर्थ आहे, असा प्रश्न समोर येतो !

मधू साबणे याने केलेला उत्तम अनुवाद ! ( सोल मौंटन )

ॲब्सर्डिटी दाखवायला किंवा विनोद करायला तुमचा समाज तसा असावा लागतो. -- हे पटले नाही. ' अब्सर्डिटी दाखवणे ' नसते आणि ' विनोद करणे ' नसते. शिवाय सगळा विनोद हा अब्सर्डिटी नसतो. ज्या लेखकाला अब्सर्डिटी दिसते त्याला दुसरे काही दाखवण्याचा पर्याय नसतो.

चांगली आठवण ! ही एकांकिका अनेक स्पर्धांतून नंबरात आली होती ! धन्यवाद ! ( इतिहास )

होय -- ही एकांकिका करणारा विनायक पडवळ हा पहिला. उन्मेष स्पर्धेत त्याने ती सादर केली होती आणि त्या वेळी तिला प्रेक्षकांचा प्रथम पुरस्कार मिळाला होता.

कुणाला पलायनवादी म्हणायचे हेही त्यांनी ठरवून टाकलेले आहे ! निव्वळ वैचारिक नसलेली अशी एक शक्यता असते, ती त्यांना समजत नाही -- त्यामुळे, ते म्हणतील ते फायनल ! वैचारिकतेच्या मर्यादा समजण्याच्या सत्यापासून त्यांनाच पलायनवाद हवा आहे ! ११-०७-२४.